

शैलेश पुरोहित
वॉटर मेट्रो
केरळ
दक्षिण केरळ
कोची – मुन्नार – तेक्कडी – आलप्पुळा

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# दक्षिण केरळ

## अर्थात

## कोची – मुन्नार – तेक्कडी – आलप्पुळा

शैलेश  पुरोहित

लेखक : शैलेश न. पुरोहित
ए/२, जस्मिन, संत रामदास मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.
टेली: ८४५२८०३६६३.
ई मेल : shain_p@rediffmail.com shainpu1208@gmail.com
छायाचित्रं : शैलेश, गंधर्व पुरोहित,
चित्रण : छायाचित्रण – Redmi Note 8 Pro, Nokia G21, Canon 70 D
व्हिडिओ एडिटिंग : गंधर्व पुरोहित. अभिवाचन – अंजना लगस

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ८ फेब्रुवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
    - आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
    - हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
- सदर प्रवास वर्णनाचा तसेच सोबतच्या छायाचित्रांचा अंशतः अथवा पूर्णतः वापर करण्याआधी लेखकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.

श्री. शैलेश पुरोहित यांची इतर पुस्तके

**वायनाड**

**इंद्रपुरी सिक्कीम**

**नौकुचीयाताल**


**जीवनगौरव (कथासंग्रह)**

**गोवा – १९८० व २०२२**


नक्की वाचा


सोबतच्या कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल


a


इंद्रपुरी
सिक्कीम


शैलेश पुरोहित
कथा दोन सहलींची
१९८० व २०२२
गोवा


शैलेश पुरोहित
वायनाड


शैलेश पुरोहित
नौकुचीयाताल


शैलेश पुरोहित
जीवनगौरव
आणि इतर कथा

# प्रास्ताविक

२०११ साली आम्ही उत्तराखंड मधील नौकुचीयाताल येथे गेलो होतो. तेव्हापासून आमचा दर एक – दोन वर्षांच्या अंतराने २०१३ गंगटोक (सिक्कीम), २०१६ ताडोबा, २०१७ पेंच, २०१८ उत्तराखंड (ऋषिकेश, टेहरी , धनोल्टी , मसूरी व देहराडून), २०१९ वायनाड (केरळ) , २०२२ गोवा असा विविध नातलगांसह प्रवास झाला . ई साहित्यवर यातील नौकुचीयाताल , इंद्रपुरी सिक्कीम, वायनाड व गोवा ही प्रवास वर्णनं प्रसिद्ध झाली आहेत. आता २०२३ ला मात्र दक्षिण केरळची भूमी पहायला आम्ही तिघंच [पत्नी (श्रावणी) , चिरंजीव (गंधर्व) व अस्मादिक] गेलो होतो.

केरळ, १ नोव्हेंबर १९५६ रोजी स्थापना झालेल्या या राज्याची, पश्चिमेस अरबी समुद्र तर दक्षिणेस हिन्दी महासागर अशी भौगोलिक रचना आहे. त्रिवेंद्रम (तिरूअनंतपुरम), कोचीन (कोची) व कलीकत (कोझिकोड) ही मुख्य तीन शहरे असणाऱ्या केरळातील कलीकत जवळ असणाऱ्या वायनाड येथे २०१९ च्या ऑक्टोबरात आम्ही जाऊन आलो होतो. संपूर्ण देशात १०० % साक्षरता असणाऱ्या राज्याबद्दल मला बरेच कुतूहल होते. केरळला जायचे म्हणून त्या राज्याचा इतिहास विकिपीडिया कडून तपासून पहिला.

केरळ या नावाच्या स्रोताबद्दल काहीशी संदिग्धता आहे. जुन्या मल्याळी भाषेनुसार केरा (नारळाचे झाड) व आलम (परिसर) असा केरळमचा अर्थ होतो, तर पारंपरिक तामीळ भाषेप्रमाणे, ‘चेरा आलम’ म्हणजे, डोंगरापलीकडील उतरणीचा प्रदेश. पुराणातील एक दंतकथेनुसार केरळची निर्मिती भगवान परशुरामाने परशू समुद्रात फेकून केली.

इसवी सनापूर्वी मौर्य साम्राज्यानंतरच्या काळात केरळ प्रांतावर चेरा घराण्याचे राज्य होते. चेरांची राजधानी वांची येथे होती. चीन, रोमन व अरबी साम्राज्यांतील मसाल्याच्या व्यापाऱ्यांचे चेरांसोबत संबंध होते. इसवीसन पूर्व ५७३ मध्ये ज्यू समाजाचे लोक प्रथम केरळात आले असे सांगण्यात येते. कोचीमध्ये ज्यू समाजाचे प्रतीक म्हणून 'ज्यू टाउन' आहे व .'परदेसी सिनेगॉग' (ज्यू प्रार्थना मंदिर) आहे.  इस्लामी व्यापारी इब्न दीनार हे आठव्या शतकात केरळात स्थायिक झाल्याचे व त्यांनी भारतात इस्लाम धर्म आणल्याचे सांगितले जाते.

भारताचा मसाल्यांचा किनारा समजल्या जाणाऱ्या केरळने ग्रीक, रोमन, अरब, चीन, पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज व्यापाऱ्यांचे व पर्यटकांचे स्वागत केले, यापैकी प्रत्येकाने या भूमीवर स्थापत्यकला, खाद्यसंस्कृती इत्यादी क्षेत्रांत आपला ठसा उमटवला.

सदर पुस्तकांत, मजकुरासोबत जोडलेल्या छायाचित्रांचा दुरुपयोग टाळण्यासाठी त्यावर 'वॉटर मार्क' टाकावे लागले त्यामुळे कदाचित चित्रं 'डिस्टर्ब' होण्याची शक्यता आहे. असो. मला दिसलेला, जाणवलेला  केरळ मी वाचकांसमोर ठेवीत आहे. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अखेर, ई साहित्यच्या प्रोत्साहनामुळेच आजवरचे लिखाण शक्य झाले. तेव्हा, ई साहित्यच्या टीमला धन्यवाद देऊन हे पुस्तक वाचकांपुढे ठेवीत आहे..

- **शैलेश न. पुरोहित (मुंबई)**

१ जानेवारी २०२४

# केरळ

२०२३ च्या दिवाळीत पुन्हा केरळात जावे असा बेत एका सकाळच्या ‘ चाय ‘ सत्रात झाला. मागच्या काही सहलींमध्ये आमच्या सोबत (किंवा आम्ही ज्यांच्या सोबत होतो) ते हेमंत व उल्का वेलणकर अनेकदा केरळला जाऊन आल्याने ते यंदा आमच्या सोबत नव्हते. मग आम्ही तिघेच (श्रावणी, गंधर्व व मी) केरळचा कार्यक्रम ठरवू लागलो. तो ठरवताना ‘मेक माय ट्रीप’ ची मदत घेतली आणि नकळत आम्हाला चांगले ‘डील’ मिळून गेले.

११ नोव्हेंबरला दुपारी १२.०० वाजताच्या एअर इंडियाच्या विमानाने कोची गाठायचे, एक रात्र कोचीत, मग मुन्नार येथे २ रात्री राहून , तेक्कडी येथे एक रात्र काढून, (आलप्पुळा) अलेप्पीला हाऊस बोटीत वीस – बावीस तासांचा मुक्काम व १६ नोव्हेंबर रोजी पुन्हा कोची आणि दुपारच्या कोची – मुंबई विमानाने परत असा कार्यक्रम ठरला. कोचीनला रेल्वेने जायचे असल्यास एर्नाकुलम येथे उतरून जाता येते. परंतु रेल्वेत चोवीस तासापेक्षा अधिक वेळ घालवण्यापेक्षा विमान प्रवास बरा असे सर्वानुमते ठरले.

## एअर इंडियाने दिलेला धक्का


वरील कार्यक्रमाप्रमाणे विमानाची तिकीटं काढली. साधारणतः ऑक्टोबरमध्ये आम्ही सहलीची सविस्तर आयटनरी बनवू लागलो. आणि अचानक एअर इंडियाने ई मेल द्वारे, ११ नोव्हेंबरचं दुपारी १२.०० वाजताचं विमान रद्द केल्याचे व आम्हाला त्याच दिवशीच्या रात्री ८.५० च्या विमानात परस्पर सामावून घेतल्याचे कळविले. रात्री ८.५० चे विमान, तेही वेळेवर निघाल्यास दोन तासांनी कोचीला उतरणार, त्यानंतर समान मिळाल्यावर विमानतळापासून ३५ किलोमीटर अंतरावरील हॉटेलवर आम्ही पोहोचणार मध्यरात्रीच्या सुमारास. म्हणजे, शनिवारी संध्याकाळी कोची शहरात हिंडण्यावर पाणी पडणार. त्यावर, एअर इंडियाच्या 'हेल्प डेस्क' सोबत बरीच भवति न भवती केल्यावर त्याने आम्हाला १० तारखेच्या संध्याकाळच्या सव्वा पाचच्या विमानात अकमोडेट केले (आमच्यावर उपकारच केले, जणू) परतीच्या प्रवासात देखील एअर इंडियाने आम्हाला इंगा दाखवला. आम्ही कोची – मुंबई प्रवासाची परतीची १६ नोव्हेंबरच्या दुपारच्या २.५०च्या एअर इंडियाच्या विमानाची तिकीटं काढली होती. त्या ऐवजी एअर इंडियाने त्याच दिवशीच्या सकाळी ७.५० च्या विमानाची तिकीटं दिली. याबाबत तक्रार करण्याचे दोर देखील एअर इंडियाने कापून टाकले होते. म्हणजे, एअर इंडियाच्या पोर्टलवरुन आम्ही व्यथा मांडण्याचा प्रयत्न केल्यावर आम्हाला कस्टमर केअर च्या हेल्प डेस्कशी बोलून घ्या, असा सल्ला मिळाला. एअर इंडियाचे 'हेल्प डेस्क' कोणतीही मदत करण्यात 'हेल्प लेस', असल्याचे लवकरच आम्हाला समजले. आणि आम्ही जेव्हा त्यांना, या गोंधळाबाबत आम्हाला अधिकृत तक्रार नोंदवावयाची आहे, असे सांगितले व त्याकरिता एखाद्या जबाबदार अधिकाऱ्याची ई मेल आयडी अथवा एखाद्या विभागाचा पत्ता, ई मेल ची विचारणा केली. यावर त्याने असे काहीही

अस्तित्वात नसल्याचे सांगितल्यावर आम्हाला ते 'हेल्प डेस्क' प्रथम 'हेल्प लेस' व आतातर अगदीच 'होप लेस' वाटून गेले. अखेर आम्ही, परतीच्या प्रवासाकरिता एअर इंडिया ऐवजी १६ नोव्हेंबरच्या दुपारी ३.५० ला निघणाऱ्या 'विस्तारा'' ने मुंबई गाठण्याचा निर्णय घेतला.

आता आम्ही आमचा मोहोरा, 'मेक माय ट्रीप' कडे आमच्या कार्यक्रम पत्रिकेत बदल करण्यासाठी वळविला. सुदैवाने मनू श्रीवास्तव, राधिका यांनी सहकार्य करीत आमच्या आयटनरीत आवश्यक ते बदल करून दिले आणि आम्ही सुटकेचा निश्वास टाकला.

१० नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी सव्वा पांचचे विमान गाठण्यासाठी आम्ही दुपारी दीड – पावणे दोनच्या सुमारास मुलुंड सोडले. मग, कासवगतीने एअर इंडियाच्या बॅगेज काउंटर पर्यन्त जाणारी प्रवाशांची नागमोडी रांग पार केली, इतर सारे सोपस्कार पूर्ण करून विमानाची वाट पहात ४० A या दारापाशी थांबलो. यथावकाश विमान आले, त्यातून सारे प्रवासी उतरले, विमानाची साफसफाई झाली आणि नंतर आम्हाला विमानात बसण्याची सूचना केली गेली. सव्वा पाचच्या ठोक्याला विमान 'पुश बॅक' होणार तोच वैमानिकाने घोषणा केली, "मुंबई विमानतळावर वाहतुकीचा भार वाढल्याने विमान सुमारे अर्धा तास उशिराने सुटेल." अखेर सहा वाजून तीन मिनिटांनी विमानाने कोचीच्या दिशेने झेप घेतली आणि सातवाजून चाळीस मिनिटांनी भारतातील पहिल्या सोलर पावरवर चालणाऱ्या, कोचीच्या विमानतळावर आम्ही उतरलो. यथावकाश समान आले आणि आम्ही हॉटेलवर जाण्यासाठी होंडा सिटी (धक्काच बसला) च्या टॅक्सीत बसलो.


AIR INDIA




विमानतळापासून पस्तीस किलोमीटर अंतरावरील ( पनवेल – कन्याकुमारी राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ) हॉटेल जे व्ही के पार्क मध्ये पोहोचायला सव्वा नऊ वाजले. रात्री दहा वाजता रेस्तॉरां बंद होणार म्हणून धावतच पहिल्या मजल्यावरील रेस्तॉरांत एखादी केरळी डिश खाण्यास मिळेल या आशेने गेलो. तर त्याने पनीर वगैरे उत्तर भारतीय पदार्थच उपलब्ध असल्याचे सांगितले. अखेर, चिकन, डाळ व पोळी (चपाती) खाऊन झोपी गेलो.

अकरा नोव्हेंबरला ड्रायव्हरला दुपारी साडेबारा पर्यन्त येण्याच्या सूचना दिल्या होत्या. म्हणजे तेव्हापासून आम्ही एम एम टी (मेक माय ट्रीप)च्या ताब्यात जाणार होतो. तत्पूर्वी, आम्ही (गंधर्व व मी) कोचीच्या वॉटर मेट्रोने तसेच वेळ मिळाल्यास तेथील एकुलत्या एक डबल डेक बसने व तीन डब्यांच्या मेट्रोने प्रवास करायचा बेत आखला. त्या प्रमाणे आम्ही सकाळीच न्याहारी करून हॉटेल बाहेर असणाऱ्या बस स्टॉपवर आलो. आम्हाला अडीच किलोमीटर दूर असणाऱ्या वैट्टीला येथे जायचे होते.

गंधर्वने चलोच्या ॲपवर ( मुंबईत कार्यरत असणारे 'चलो' भारतातील बावन्न शहरांत सेवा देत असल्याची नवी माहिती मिळाली) तेथे जाणारी बस किती वेळाने येणार हे पहिले. बसची वेळ त्याला बस क्रमांकासह मिळाली. पांच – सात मिनिटांत बस आली. आणि पुढल्या दहाव्या मिनिटाला आम्ही वैट्टीलाला पोहोचलो. येथे पुलावर मेट्रो स्थानक, जमिनीवर बस स्थानक व शेजारी वॉटर मेट्रो स्थानक असल्यामुळे या जागेचा स्थानिक उल्लेख वैट्टीला हब असा करतात.

[(कोची मेट्रो वैट्टीला स्थानकात येतानाचा व्हिडिओ )]









## केरळ म्हणजे बॅकवॉटर व  कोचीन – कालव्यांचे शहर

सह्याद्री पर्वतरंगांमधून  खाली वाहणाऱ्या अनेक नद्यांच्या तोंडावर नदी आणि समुद्र किनाऱ्यावरील प्रवाहांच्या क्रियेमुळे बॅकवॉटरची निर्मिती झाली.  या बॅकवॉटर जवळ केरळमधील अनेक शहरे आहेत जी क्रूझ ने जोडली गेली. संपूर्ण केरळमध्ये ३४ बॅकवॉटर्स आहेत. नद्यांचे खारे पाणी समुद्राला मिळते, तेथे केरळमध्ये थन्नेरमुक्कम जवळ एक बॅरेज बांधण्यात आलं आहे, त्यामुळे समुद्राचे खारे पाणी नदीच्या मुखातून पुन्हा आत येत नाही. बॅकवॉटर परिसरात बेडूक, खेकडे, मडस्किपर, किंगफिशर, डार्टर्स सारखे जल प्राणी / पक्षी राहतात अशी माहीती मिळाली.

कोचीचे आणखी एक आकर्षण म्हणजे, तेथील विंबनाड तलाव. कोचीन ते अलेप्पी असा १२२ किमीवर पसरलेला (क्षेत्रफळ २०३३ किमी) हा महाप्रचंड तलाव. या तलावात कालव्यांचे मोठे जाळे आहे. या तलावामध्ये विलींग्डन आयलंड हे मानवनिर्मित बेट लागतं. या बेटाचा बराचसा भाग नौसेनेच्या सदर्न कमांडच्या  व कोची पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात आहे.  ताज सारखी तारांकित हॉटेलं या विभागात आहेत. हे बेट मटनचेरी पुल आणि वेंडरती पुलाने कोचीला जोडलेले आहे.

कोचीन शहरांतून पेरियार नदी वाहते. शहरातून प्रवास करताना असंख्य कालवे दिसले. या कालव्यांची निर्मिती केव्हा व कशी झाली याबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीची भेट झाली नाही. परंतु, शहरभर जलपर्णींनी भरलेले कालवे होते. अगदी बॅक वॉटरची सैर घडविणाऱ्या छोट्या मोटर बोटींपासून मोठ्या बार्ज पर्यन्त साऱ्या वाहनांना  जलपर्णी टाळून रस्ता काढताना याची देही पाहिले. कोचीनमध्ये आम्ही रहात असलेल्या हॉटेलच्या पाठीमागे देखील एक कालवा होता.  कोचीन मधील कालव्यांतून जलवाहतुक, मासेमारी सर्रास होत होती.

## कोचीची वॉटर मेट्रो

कोची शहरात डिसेंबर २०२१ पासून वॉटर मेट्रो सुरू करण्यात आली. सध्या वैट्टीला – काकनाड , हायकोर्ट – वायपीन व हायकोर्ट – बोलगट्टी या तीन मार्गांवर वॉटर मेट्रो कार्यान्वित आहे. बॅटरीवर चालणारी ही मोटर बोट सेवेने पुढील काळात १५ मार्गांद्वारे दहा बेटं जोडण्याची योजना आहे. सध्या वैट्टीला – काकनाड , हायकोर्ट – वायपीन व हायकोर्ट – बोलगट्टी या मार्गांवर वॉटर मेट्रो कार्यान्वित आहे. एकूण ८१९ कोटींच्या या प्रकल्पाला वित्त पुरवठा इंडो – जर्मन फायनान्स कॉर्पोरेशनने केला आहे आणि या मोटर बोटींची बांधणी कोचीन शिपयार्ड मध्ये करण्यात आली आहे.

वैट्टीला पासून काकनाड १६ किलोमीटर, वॉटर मेट्रो हे अंतर २० मिनिटांत पार करते. कोचीच्या कालव्यातून, नदीतून, बॅक वॉटर मधून आजूबाजूला असणारे टुमदार बंगले पहात केलेल्या प्रवासाचे अनेक फोटो , व्हिडिओ काढले.



वॉटर मेट्रो



वैट्टीला वॉटर मेट्रो स्थानक




[(वॉटर मेट्रो सफरीचे व्हिडिओ )]






a




वॉटर मेट्रोतून सफर

a

काकनाडहून वैट्टीलाला परतेस्तोवर ११.०० वाजून गेले होते, तेव्हा डबल डेक बस व मेट्रो रेल्वेचा बेत रद्द करून आम्ही हॉटेल गाठले. सव्वा बारा वाजताच चालक उमेश आपली स्विफ्ट SX4 घेऊन हजर झाला. सर्वप्रथम आर्याज् च्या प्योर व्हेज हॉटेलात मिळणारी केरळी थाळी पोटात रिचवून आम्ही बॅक वॉटर सफरीला निघालो. अर्धा पाऊण तासाच्या सफरीत अनेक पक्षी, जलचर दिसले परंतु त्यांना आमच्या कॅमेऱ्यात कैद करता आले नाही.







केवळ,  कोचीनमध्येच आम्हाला पांढऱ्या शिराचा गरुड दिसला, त्याची एक झलक.



चायनीज फिशिंग नेट

a

नंतर आम्ही फोर्ट कोचीकडे निघालो. रस्त्यात चायनीज फिशिंग नेट्स दिसली. कोकणात रांपण प्रकार प्रचलित आहे. ही त्याचीच लघु आवृत्ती वाटली. अर्थात रापण हे समुद्रातील मासेमारीचे सार्वजनिक रूप वाटले तर येथील मासेमारी खासगी वाटली.

चक्क पर्यटकांकडून दोन पाचशे रुपये घेऊन चित्रात दिसतय ते जाळं पाण्यात,अक्षरशः बुडवतात आणि काही वेळाने त्या जाळयाच्या वरील बाजूस असणाऱ्या बांबूंना वजनी दगड बांधलेले असतात, जाळं पाण्यात गेल्यावर हे दगड उचलले जातात. दगड बांधलेले बांबू दोरखंडांच्या सहाय्याने ओढले जातात व पाण्यातून जाळं वर येतं, पर्यटक दिवसभर येतच असतात तेव्हा केवळ दोन – चारच मासे जाळयात येतात. अर्थात, फिशिंग नेटचे मालक ते आपल्याकडेच ठेऊन घेतात. या बाबत असे समजले, कोची, आलप्पुळा (अलेप्पी ) भागात रात्रीची नौकाविहारास परवानगी नाही. जेणेकरून समुद्रातून मासे तलाव, नद्या, कालव्यांत यावेत व लहान मच्छीमारांना मासेमारी करण्यास वाव मिळवा.

a

तेथून आम्ही सेंट फ्रान्सिस् चर्चच्या रोखाने गेलो. शनिवारी हे चर्च दुपारी एक वाजताच बंद होत असल्याचे वर्तमान आम्हाला तेथे गेल्यावर समजले.

वास्तविक १५०३ मध्ये बांधलेले हे भारतातील पहिले चर्च, येथे १५२५ साली वास्को द गामा यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले होते, ती जागा व ते चर्च आतून पाहण्याची इच्छा होती.

डच पॅलेसकडे जाताना, रस्त्यात सेंट कॅथलिका बॅसिलिका हे १९०२ मध्ये बांधलेले चर्च बाहेरूनच पाहिले. कोचीच्या मटनचेरी भागात असलेला व मटनचेरी म्युझियम म्हणून प्रसिद्ध असलेला हा राजवाडा पोर्तुगीजांनी बांधला, पुढे १६६३ मध्ये डचांनी त्याची पुनर्बांधणी केली. आज त्या वास्तूच्या पहिल्या मजल्यावर केरळ मधील राजे, कला, शिल्प, संस्कृतींचं दर्शन घडविणारे संग्रहालय आहे. येथे वीणा वर्ल्डचे पर्यटक होते.


G20
ST. FRANCIS CSI CHURCH
सेंट फ्रान्सिस चर्च, कोची


मटनचेरी म्युझियम

ते संग्रहालय पाहून आम्ही, ज्यू टाऊन कडे वळलो.



ज्यू टाऊन, कोची


ज्यू टाऊन



ज्यू टाऊन


ज्यू टाऊन मधील एक कॅफे

कोचीच्या या भागात ज्यू समाज सर्वप्रथम येऊन राहिल्याचे सांगितले जाते. आता त्या भागात अँटिक्स वस्तु विक्रीस ठेवलेली अनेक कॅफे पहायला मिळाली. या परिसराच्या सुरुवातीला असणाऱ्या नामफलकावर (Market for art, antiques, crafts and spices) असं स्पष्ट लिहिलेले दिसतं. या दुकानांत तांबा – पितळेच्या विविध जुन्या पुराण्या वस्तूंपासून पंधरा वीस फुट लांबीच्या जहाजापर्यन्त बरच काही विकण्यास ठेवलेलं दिसलं. त्या पाहता पाहता ग्राहकांना आपल्या जिभेचे चोचले पुरविण्याची देखील सोय येथे दिसली.

a

या टाउनच्या पुढच्या गल्लीत (गल्ली म्हणण्यापेक्षा बोळात) ‘परदेसी सिनेगॉग’, ज्यूंचे प्रार्थना स्थळ आहे. येथे देखील वीणा वर्ल्डचे पर्यटक होते.

आज शनिवार असल्याने सिनेगॉग बंद होतं.

फोर्ट कोची विभागात, रस्त्यावर अनेक ठिकाणी मासे विक्रीसाठी ठेवलेले दिसले. तेथून ते विकत घेऊन नजीकच्या टपऱ्यांवर अथवा खाद्यपदार्थ विकणाऱ्या गाड्यांवर गेल्यास ते तुम्हाला हवा तो पदार्थ आपणासमोर बनवून देतात. आम्ही मात्र असे काही करण्याच्या फंदात पडलो नाही.



परदेसी सिनेगॉग

आता आमच्या चालकाला हॉटेलवर परतायचे वेध लागू लागले. परतीच्या प्रवासात तोप्पुमपडी भागातून आमची गाडी जात असता अचानक गंधर्वला, सकाळी ज्या बसने प्रवास करण्याचे आम्ही मनसुबे आखत होतो, ती बस एका स्टॉपवर उभी दिसली.

मग काय, गंधर्वने ड्रायव्हरला तत्काळ आमची गाडी थांबवायला लावली व बस चौकीत जाऊन चौकशी करून आला. बस आणखी पाऊण तासाने निघणार होती व आमच्या हॉटेल समोरून अंगमाली डेपोपर्यंत जाणार होती. मी व गंधर्व तेथेच गाडीतून उतरलो व श्रावणीला हॉटेलवर सोडण्यासाठी गाडी निघाली. मुंबईतील सवयी प्रमाणे आम्ही दुमजली बसच्या वरच्या मजल्यावर जाऊन बसलो, पहातो तो आम्ही दोघेच प्रवासी, इतर सारे खालच्या मजल्यावरून प्रवास करीत होते. बसने निघण्याच्या थांब्या पासून निम्याहून अधिक अंतर पार केले तरी कुणीही वरच्या डेकवर फिरकले नाही. आम्ही उतरण्यापूर्वी पांच सहा प्रवासी वरच्या मजल्यावर आले, कंडक्टर देखील त्यांचे सोबत आला व तिकिटे देऊन गेला. दोनही मजल्याना एकच कंडक्टर होता. मुंबई - पुण्यात दोन वाहकांची सवय असलेल्या आमच्या नजरेला हे दृश्य काही मानवलं नाही.




कोची येथील दुमजली बसचा वरचा रिकामा मजला

( डबलडेक बस नेटटूर पुलावर येतानाचा व्हिडिओ )

a



डबलडेकर बस , कोची




a

रविवार, १२ नोव्हेंबर रोजी सकाळी इडली, पुरी भाजी, छोले भटूरे ( केरळात नास्त्याला छोले-भटूरे) अशी न्याहारी करून आम्ही मुन्नारकडे रवाना झालो. कोची ते मुन्नार, अंतर – १२६ किमी. रस्त्यात वालरा धबधबा लागला.

तेथे पांच मिनिटं रेंगाळलो. तेथून पुढे आम्ही 'क्ले ओव्हन' नावाच्या रेस्टॉरांत 'मेक माय ट्रीप' तर्फे देण्यात येणाऱ्या केरळच्या पारंपरिक 'साद्य' थाळीचा आस्वाद घेण्यासाठी पोहोचलो.

साद्य थाळीचा, थोडक्यात चौरस सात्विक भोजनाचा. अप्रतिम असा अनुभव घेऊन, तुडुंब जेऊन आम्ही मुन्नारकडे कूच केलं. या थाळीतील अवियल, बिटाची कोशिंबीर, दोन प्रकारचं पायसम अप्रतिम. पानावर वाढलेले आम्ही संपविले. सुग्रास अन्नाची या निमित्ताने अनुभूती मिळाली.


Gandharva Purohit

रस्त्यात अनेक स्पाईस गार्डनस् लागली, त्यातल्याच एका बगीचात थांबलो. तेथील मेहता नावाच्या ‘माहित्या’ने (बागेची माहिती देणाऱ्याने) ते ३४० एकरांत या मसाल्यांची कशी लागवड करतात , विविध मसाले कसे पॅक करतात, औषधी वनस्पतींपासून कशी औषधे तयार करतात व तेथल्याच विक्री केंद्रात ती कशी उपलब्ध आहेत वगैरे माहिती दिली. ज्या व्यक्तीला आमच्या आरोग्याची कोणतीही माहिती नाही ती व्यक्ती आम्हाला असणाऱ्या व्याधींवर औषधं कशी काय सुचवू शकते असा विचार आमच्या मनात आला व आम्ही तेथून काढता पाय घेतला. परंतु, दुकानात बरीच गर्दी होती व ग्राहक विविध औषधं विकत घेण्यात दंग होती हे मात्र आम्ही पाहिले.  चार  वर्षांपूर्वी आम्ही वायनाड येथे गेलो होतो, आणि गतसाली गोव्याला, दोनही ठिकाणी असाच प्रकार अनुभवला.

तेथून सेंगुलम धरणावरून मुन्नारचे लेक फॉरेस्ट रिसॉर्ट गाठले.






मुन्नारच्या हॉटेल मधून दिसणारं दृश्य

a

मुन्नार येथील लेक फॉरेस्ट रिसॉर्टच्या खिडकीतून दिसणारं दरीचं दृश पहात राहावं असेच होते. आज दिवाळी असल्याने हॉटेलात सर्वत्र उत्साहाचे, उत्सवी वातावरण होते.


मुन्नारचे हॉटेल, लेक फॉरेस्ट

या रिसॉर्टमध्ये मात्र दिवाळीचं सेलिब्रेशन जोरात दिसलं.

(हॉटेलच्या छतावरून दिसणारं दृश्य – व्हिडिओ).


मुन्नारच्या हॉटेलमधील दिवाळी

a

नौकूचीयाताल प्रमाणे येथे लक्ष्मी पूजन नव्हते परंतु, जिन्याच्या दुतर्फा पणत्या लावल्या होत्या.  आठ वाजण्याच्या सुमारास हॉटेलचे कर्मचारी पर्यटकांकरिता पायसम व बर्फी घेऊन आले. त्या नंतर हॉटेल पाठीमागच्या दरीतून फटाक्यांचा आवाज होता बऱ्याच वेळ. मुन्नारला हवामान थंड असेल म्हणून आम्ही थंडीचे कपडे बरोबर ठेवले होते, परंतु त्यांना अजिबात हवा लागलीच नाही.

दुसरे दिवशी सकाळी सहाच्या सुमारास आम्ही तिघे, आसपासचा परिसर पाहण्यासाठी बाहेर पडलो. रिसॉर्ट बाहेरील उतारावरून खाली आलो. एका टिपिकल खेड्यातील हॉटेलात चहा घेतला व रिसॉर्टवर परतलो.

येताना रस्त्यात हे ‘कप्पा’ एका दुकानात रचलेले दिसले, केरळात रस्तोरस्ती यांचे ढीगच्या ढीग विकायला ठेवलेले आम्ही पहिले. त्याचे चिप्स सर्वत्र मिळतात.



कप्पा

साडेनऊच्या सुमारास तयार होऊन न्याहारी केली. मुन्नारच्या या रिसॉर्टमधील अन्नात (मग रात्रीचे डिनर असो की सकाळचा नास्ता साऱ्या पदार्थांत ( अगदी चटणीत सुद्धा) आल्याचा सढळ वापर जिभेला जाणवण्या इतपत होता. मी ही बाब रेस्टॉरांच्या मॅनेजरला सांगितली, त्याने, येथील अन्नाचा तो एक आवश्यक घटक असल्याचे सांगून वेळ मारून नेली, असा मी समज करून घेतला.

येथून गाशा गुंडाळून तेक्कडीच्या रस्त्याला लागण्यापूर्वी चालकाने चार – सहा जीप मध्ये आमची गाडी नेऊन उभी केली. "Sirr, here you can enjoy jeep safari. This jeep will take you to five to seven points where car can't go. Very good experience sirr." गाडीतून गंधर्व व मी उतरलो, आमचा ड्रायव्हर आमच्या सोबत आला. तेथील व्यक्तींसोबत मल्याळी भाषेत काहीतरी संभाषण केलं व बाजूला जाऊन उभा राहील. आता दोन लुंगीधारी आम्हाला पटवू लागले.  पांच स्पॉट्स, सात स्पॉट्स, दहा स्पॉट्स .. मला माथेरानला घोडेवाल्यांची कशी पांच पॉईंट्स, सात पॉईंट्सची भाषा असते, तसंच काहीसं वाटलं. त्यांनी सुरुवात सात हजारांपासून केली. मी दोनदा उठून निघालो, ते पाहताच आमचा ड्रायव्हर आमच्या संभाषणात उतरला. अखेर तीन हजार रुपये देऊन दोन तासाची भ्रमंती, असा सौदा ठरला व आम्ही तिघे जीपने निघालो.  ( रिपल वॉटर फॉलचा व्हिडिओ )

a



a





पहिलाच रिपल वॉटर फॉल आला. जीप थांब्या पासून धबधब्याच्या दर्शक गॅलरी बरीच दूर होती. वरील, एक छायाचित्र गॅलरीकडे जाणाऱ्या मार्गावरून काढलेले आहे तर दुसऱ्या छायाचित्रात दर्शक गॅलरीसह धबधबा दिसतो आहे. गॅलरी पर्यन्त जाणाऱ्या मार्गाच्या दुतर्फा विविध स्टॉल्स दिसले. तेथून आमची गाडी पोनमुडी डॅमच्या दिशेने निघाली. दरम्यान एक ब्रिटिशकालीन रोप ब्रीज लागला. या पुलाच्या बरंच अगोदर आमची जीप थांबली. कारण पुढे चारचाकी वाहनांना प्रवेश बंदी होती. वास्तविक जीप सफारी ठरवताना आम्हाला, या ब्रीजवरून जाणाऱ्या जीपचे छायाचित्र दाखविले होते. त्यामुळे या पूलावरून जीप जाताना छायाचित्रं काढता येतील या भ्रमात आम्ही होतो. प्रत्यक्षात आम्ही चालत पुल पार केला. पोनमुडी धरणातून निघून, पूलांखालून वाहणाऱ्या पाण्याचे  दृश्य पहात रहावे असेच होते.

a






a

त्यानंतर अत्यंत चिंचोळया रस्त्याने (की वाटेने) आम्ही निघालो .. आता समोरून वाहन आल्यास कसे व्हावे हा विचार मनात येतो न येतो तोच समोरून कियाची SUV दत्त म्हणून उभी राहिली. मग समोरच्या चालकाच्या वाहन चालन



क्षमतेची कठोर चाचणी झाली व आम्ही सुटलो एकदाचे. या मागचे कारण म्हणजे, आमच्या पाठीमागे सरळसोट चढणीचा रस्ता होता, तर समोरील वाहन चढणीवर असून त्याच्या मागे काही अंतरावर दोन वाहनं शेजारी उभी राहू शकतील एवढीच जागा होती. . (याचा व्हिडिओ जोडत आहे)

तेथून जीप 'एको' पॉइंट कडे निघाली. पोनमुडी धरणाच्या वरील बाजूस ही जागा आहे. विशिष्ट जागेवरून जोराचा आवाज केल्यास अथवा हाक मारल्यास त्याचा प्रतिध्वनी उमटतो, असे आम्हाला सांगितले गेले. परंतु, तेथे उपस्थित असणाऱ्या शंभर एक लोकांपैकी एकानेही हा प्रयोग केला नाही. त्यानंतर जीप आणखी थोडा चढ चढून पुढे गेली व नाडगाडी व्हू पॉइंटला थांबली.



a

केरळमधील लाहानातल्या लहान खेड्यातून रस्त्याने प्रवास करताना रस्त्यांची स्थिती उत्तम जाणवली तर केरळला मिळालेले निसर्गाचे वरदान सर्वत्र जाणवले. ( निसर्गरम्य केरळचा व्हिडिओ )



a

येथेच आमची जीप सफारी संपली व तेथून आम्ही हायड्रो इलेक्ट्रिक प्रोजेक्टला वळसा घालून हॉटेलवर परतलो. आमच्या बॅगा तयारच होत्या, त्या गाडीत भरून आम्ही तेक्कडीकडे निघालो.

मुन्नार ते तेक्कडी साधारण अंतर ९८ किलोमीटर. रस्त्यात माकोफा चॉकलेट फॅक्टरीत थांबलो. कोची – मुन्नार – तेक्कडी भागांत अनेक चॉकलेट बनविणारे कारखाने दिसले. . चॉकलेट्सची मोठमोठी दुकाने दिसली. आत शिरतानाच चॉकलेटची निर्मिती पहायला मिळेल काय असे विचारले. त्यांनी होकार दिला म्हणून आत गेलो. तर दुकानाच्या एका कोपऱ्यात आम्हाला नेण्यात आले व एक बाबा चॉकलेटची निर्मिती कथा सांगू लागला. मी त्याला मध्येच थांबवले व विचारले, “तुमच्याकडे कोको च्या फळांपासून चॉकलेट बनवतात ना, मग ती प्रोसेस मला पाहायची आहे. इकडे तर तयार चॉकलेटचे बार मोल्ड मध्ये घालून चॉकलेट निर्मिती होताना दिसते आहे” , आता तो निरुत्तर झाला, आणि आम्ही तेथून बाहेर पडलो. पुढे रस्त्यात दोन – तीन ठिकाणी थांबलो. परंतु, प्रत्येक ठिकाणी तीच कथा. आमच्या ड्रायव्हरच्या मनात आम्हाला आणखी एक जीप सफारी घडवावी असा विचार असावा. तो आमच्या पुढे जीप सफारीचा महिमा गाऊ लागला. ही जीप सफारी एक ते दोन तासांची व किमत फक्त चार हजार रुपये. मी तो प्रयत्न हाणून पडताना म्हटले, या जागेपासून हॉटेल पंधरा किलोमीटर्स दूर आहे, आता दुपारचे पावणे तीन वाजताहेत, आपण अर्ध्या तासात हॉटेलवर जाऊ, चेक इन करू. ‘कलारी पैयत्टू’ चा कार्यक्रम संध्याकाळी पांच वाजता. चहापाणी करू व पुन्हा येऊ. तो कुरकुर करू लागला. आता मी त्याला उघडं पाडायचे ठरवूनच गाणित मांडले, बाळा, या जागेपासून हॉटेल स्प्रिंगडेलवर (१५ किमी) जाण्यास अर्धा तास, येण्यास अर्धातास. म्हणजे साधारण दोन लीटर पेट्रोल ( ₹ २००/-) तुझे ते पैसे वाचविण्यासाठी मी चार हजार का खर्च करावेत?

तुम्ही काहीही सांगावे व आम्ही पर्यटक म्हणून मानावे असे नाही. बरं, आम्ही सिक्कीम, हिमाचल, उत्तराखंड इत्यादी भागातील पर्वत, दऱ्या पाहून आलेलो आहोत. त्याच्या जवळपास पोहोचेल असे केरळातील ‘अन्नामुदी’ शिखर (Peak) दाखवत असल्यास चल. आता मात्र तो वरमला व ज्या दुकानात ‘कलारी पैयट्टू’ची तिकीटं घेण्यासाठी आम्ही गेलो होतो तेथून जीप सफारी न ठरवता केवळ कार्यक्रमाची तिकीटं घेऊन परतलो.

या सहली दरम्यान एक बाब लक्षात आली. केरळात गावोगावी जीप , बॅकवॉटर राईड्स आहेत, तुमचा वाहन चालक त्याच्या ओळखीच्या ठिकाणी तुम्हाला नेऊन राईड्स घेण्याचा आग्रह करतो, तुम्ही चांगली घासाघीस केल्यास ठीक अन्यथा... पर्यटकांनी प्रसंगी या राईड्सना नकार देण्याचीही तयारी ठेवावी.

तेक्कडी येथील वांडीपेरियार गावात असणारे ‘हॉटेल स्प्रिंगडेल हेरिटेज’ सुंदरच होते. त्याची काही छायाचित्रं.










स्प्रिंगडेल हेरीटेज


शैलेश पुरोहित
स्प्रिंगडेल, तेक्कडी

संध्याकाळी आम्ही ‘कलारी पैयत्टू’ कार्यक्रम पाहण्यास गेलो. प्रथम एक तास कथकली व नंतर एक तास मार्शल आर्ट असे दोन वेगवेगळ्या रंगमंचावर खेळले गेले. (‘कलारी पैयत्टू’चे व्हिडिओ )





a




कथकलीचा कार्यक्रम चांगला रंगला. त्यात कलाकारांनी, प्रेक्षकांना सहभागी केल्याने तो अधिक खुलला. दुसऱ्या कार्यक्रमाचे व्हिडिओ पाहण्यासारखे आहेत.

दुसऱ्या दिवशी तेक्कडी ते आलाप्पुळा अंतर १३८ किमी. आणि आम्हाला १२.३० पर्यन्त पोहोचायचे होते. १२.३० ते १.०० च्या दरम्यान हाऊस बोट सुटणार होती, अन्यथा संध्याकाळी पांच वाजता ती जेथे मुक्कामास थांबणार होती तेथे ती गाठावी लागेल, असा सज्जड दम आम्हाला बोट चालकाने आधल्या दिवशीच दिला होता. तेव्हा सकाळी ७.३० वाजता निघायचे ठरले. स्प्रिंगडेल हॉटेलमध्ये दोन दिवस मुक्काम हवा होता असे वाटते. पाहू पुढील वेळी येथेच दोन – तीन दिवस मुक्काम करू असे म्हणत हॉटेल सोडले.

सकाळी बरोब्बर साडेसात वाजता आम्ही हॉटेल सोडले. हॉटेलने आम्हाला कोरडा नास्ता बांधून दिला.

सव्वा बाराच्या सुमारास आम्ही अलेप्पीला पोहोचलो. पुढील पंधरा मिनिटांत इतर सहप्रवासी बोटीवर पोहोचले व १२.३० वाजता आमच्या बोटीने किनारा सोडला.

[(हाऊस बोटीचा व्हिडिओ)]



## तरंगता बाजार

बोटीने किनारा सोडून ती बऱ्यापैकी पाण्यात गेली आणि भोवती स्पीड बोटी फिरू लागल्या. प्रथम काही समजले नाही. मी जेव्हा बोटीच्या प्रवेशद्वाराजवळ येऊन उभा राहिलो तेव्हा एक स्पीड बोट आमच्या बोटीच्या समांतर, अगदी जवळ आली. आणि कानी शब्द ऐकू आले, “स्पीड बोट राईड.. स्पीड बोट राईड “. आमच्या बोटीतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्याने त्याची बोट इतरत्र वळविली . आईस्क्रीमच्या दोन बोटी (एक नॉन ब्रांडेड तर एक अमूल आइसक्रीमची) फिरत होत्या. हे सारं पाहून मोठी गंमत वाटली.



तरते फेरीवाले

आमच्या बोटीवर एक बंगाली जोडपं, एक गुजराती भाषिक माय - बाप व त्यांचा लेक वगळता इतर सारे मराठी भाषिकच होते.

दुपारी दोनच्या सुमारास आमची बोट पंबा नदी किनारी असणाऱ्या एका निर्जन जागेत थांबली. साऱ्या पर्यटकांना बोटीच्या वरच्या मजल्यावर असणाऱ्या डायनिंग हॉल मध्ये भोजनसाठी येण्याचे निमंत्रण दिले गेले. भोजनात केरळचा स्टेट फिश, 'पर्ल स्पॉट फिश' म्हणजेच करिमिन होता.




त्यानंतर तासाभराने आमची हाऊसबोट पुन्हा निर्जन अशा धक्क्याला लागली. तेथे जवळ असणाऱ्या दुकानांतून पर्यटक वस्तु खरेदी करू शकतात असे आम्हाला सांगण्यात आले. मासे खरेदी केल्यास बोटीवर ते शिजवून दिले जातील. बोटीवरील सारे पर्यटक परराज्यातून आलेले, त्यामुळे कुणीही तेथे खरेदी करण्याचे धाडस दाखविले नाही.

a



संध्याकाळी चार – साडेचारच्या सुमारास 'हाय टी' म्हणून कांदा भजी व चहा झाला.

संध्याकाळी सव्वा सहाच्या सुमारास आमची बोट पल्लतुरुता गावापाशी रात्रीच्या थांब्यासाठी येऊन उभी राहिली. बोटीवरील बरीचशी मंडळी पाय मोकळे करण्याकरिता उतरली, मी व गंधर्व देखील उतरलो, श्रावणीचा पाय त्रास देऊ लागल्याने मुन्नारच्या जीप राईड पासून बसूनच होती, आजही ती बोटीतील खोलीतच बसून होती. आम्ही जवळच्या पुलाच्या कडेने जाणाऱ्या पाऊल वाटेने रस्त्याला लागलो, काही मंडळी रस्ता ओलांडून गेली. रस्त्यावर एक केरळी मासे विकत होता.



पुढे अंधारून येई पर्यन्त आम्ही आसपासच्या परिसरात हिंडलो.




a

रात्री बोटीवर कॅंडल लाइट डिनर होते.




रात्रीच्या भोजनात चिकन होते. हाऊस बोटीवर रात्री नऊ ते सकाळी सहा वाजेपर्यंत वातानुकूलन यंत्र चालतात. परंतु कॅंडल लाइट डिनर चालू असताना डायनिंग हॉलमध्ये A/C चालू होता. रात्री दहाच्या सुमारास बोटींवरील खोल्या गारेगार झाल्या, तत्पूर्वी पावसाची एक जोरदार सर आली व सारे झोपी गेले. सकाळी सहाच्या आधीच जाग आली. मी बाहेर एक चक्कर मारून आलो. छान वाटलं. साडेसातच्या सुमारास चहा पोह्यांची न्याहारी करून बोटीने परतीची वाट धरली.




परतीच्या प्रवासात अलेप्पी - कोट्टायम अशी फेरी बोटींची वर्दळ दिसली, यातून विद्यार्थी, नोकरदार प्रवास करताना दिसले. खालील छायाचित्रात एक फेरी स्टॉपवर उभी असल्याचे दिसते आहे.

(अलेप्पी – कोट्टायम फेरीचा व्हिडिओ )



a

या फेरीचा रूट मजेशीर होता. तिचा एक थांबा डाव्या किनाऱ्यावर तर पुढचा थांबा उजव्या किनाऱ्यावर असल्याने तीचा प्रवास झिगझॅग पद्धतीने चालला होता. घाई साऱ्यांनाच होती, परंतु कुणीही कुणाच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करीत नव्हते. सदर फेरीच्या व इतर बोटींच्या चालकांचे कोऑर्डिनेशन इतके सुंदर होते की, कुणीही एकमेकाच्या रस्त्यातही येत नव्हतं. सारी वाहनं (!) ठराविक वेगाने चालली होती. डोळ्याचं पारणं फेडणारं दृश्य होते ते. बोटीच्या वरच्या डेकवरून इतर बोटींच्या या साऱ्या हालचाली पाहणं हा एक वेगळाच अनुभव होता, मी तो अनुभवत होतो तर, गंधर्व बोटींच्या लगबगीचे व्हिडिओ काढण्यात गुंग होता. अखेर नऊच्या सुमारास आमची बोट ठरलेल्या ठिकाणी पोहोचली. बॅगा डिक्कीत भरल्या व आम्ही कोचीकडे रवाना झालो. (जेथून बोट निघाली, त्या ठिकाणी परतताना व्हिडीओ)

रस्त्यात अळुवा शहरांत 'चैत्रम'कडे पाईनॅपल हलवा व इतर पदार्थ घेण्यासाठी थांबलो, तेथील विक्रेत्या मुलाने मराठीत संवाद साधून आमची टोपीच उडवली. त्याच्या मराठी बाबत खुलासा करताना तो म्हणाला, या दुकानात महाराष्ट्रातून वीणा वर्ल्ड, केसरी ट्रॅव्हल्सचे पर्यटक नियमित येतात, त्यामुळे मराठी समजतं, बोलू शकतो. आणि खरंच बाहेर केसरीची बस आली. तेथून पुढे भोजनासाठी आम्हाला सरवाणा भवन येथे जाण्याचा विचार होता परंतु आमच्या चालकाने पुन्हा एकदा आर्याज् पुढे गाडी नेऊन उभी केली. दुपारी पाऊणच्या सुमारास आम्हाला कोचीन विमानतळावर उतरवून आमचा चालक निघून गेला. आणि ..

a






संध्याकाळी सहा वाजता आम्ही मुंबई विमानतळावर उतरलो व तेथेच आमच्या केरळ सहलीचे सूप वाजले.

**जग सुंदर आहेच.**

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमाजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य “जाणवू” लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक

जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

a

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

esahity@gmail.com

www.esahity.com

9987737237 (WhatsApp)